**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 09 वाजून 20 मिनिटं**

**दिनांक:27.03.2024** **वारः बुधवार**

---

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस
- उष्णतेच्या लाटेच्या पार्श्वभूमीवर मतदाना दरम्यान निवडणूक आयोगाकडून खबरदारीच्या सूचना
- सामंजस्य करार झालेल्या देशांनाच लढाऊ विमानं निर्यात करण्याचा जपानच्या मंत्रिमंडळाचा निर्णय आणि
- मियामी खुल्या टेनिस स्पर्धेत, रोहन बोपण्णा आणि मॅथ्यू एबडेन जोडीचा उपांत्य फेरीत प्रवेश.

............................................................................

**निवडणूक**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस आहे. बिहारमध्ये मात्र उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख परवा 29 मार्च ही आहे.

उद्या 28 मार्च रोजी उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात येईल तर 30 मार्च ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे.

बिहारमध्ये 30 मार्च रोजी उमेदवारी अर्जांची छाननी होईल आणि 2 एप्रिलपर्यंत अर्ज मागे घेता येतील; तिथे 19 एप्रिल रोजी मतदान होणार आहे.

पहिल्या टप्प्यात लोकसभेच्या 102 जागांसाठी 17 राज्ये आणि 4 केंद्रशासित प्रदेशांमध्ये निवडणुका होणार आहेत. यामध्ये तामिळनाडूच्या 29, राजस्थान 12, उत्तर

प्रदेश 8, मध्य प्रदेश 6; तर उत्तराखंड, आसाम आणि महाराष्ट्रात प्रत्येकी 5 जागांसाठी मतदान होणार आहे. बिहारमध्ये 4, पश्चिम बंगाल 3; अरुणाचल प्रदेश, मणिपूर, मेघालयमधे प्रत्येकी 2; आणि छत्तीसगड, मिझोराम, नागालँड, सिक्कीम, त्रिपुरा, अंदमान आणि निकोबार बेटं, जम्मू आणि काश्मीर, लक्षद्वीप आणि पुद्दुचेरीमध्ये - प्रत्येकी एका जागेसाठी- पहिल्या टप्प्यात मतदान होणार आहे.

लोकसभेच्या दुसऱ्या टप्प्यातील 89 जागांसाठीची अधिसूचना परवा 29 मार्च रोजी काढली जाणार आहे.

**निवडणूक**

या पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातल्या नागपूर, रामटेक, चंद्रपूर, भंडारा-गोंदिया आणि गडचिरोली- चिमूर या पाच लोकसभा मतदारसंघांमध्ये 19 एप्रिलला मतदान होणार आहे. या पाच लोकसभा मतदासंघात काल अखेर 40 उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

**निवडणूक उष्णता**

देशातल्या उष्णतेच्या लाटेच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगानं सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकरता सूचना जारी केल्या आहेत.
भारतीय हवामान खात्यानं यंदाच्या उन्हाळ्यात नेहमीपेक्षा जास्त तापमान राहण्याचा अंदाज व्यक्त केला असून ते मार्च ते जून या कालावधीत नेहमीपेक्षा जास्त काळ टिकेल असा अंदाज आहे. यामुळे निवडणूक आयोगानं राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानं जारी केलेल्या सुचनांची प्रत जारी केली आहे. मतदान केंद्रांवर पिण्याचं पाणी आणि सावलीची सोय या किमान सुविधा पुरवण्याच्या सूचना निवडणूक आयोगानं सर्वच मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. याशिवाय ओ.आर.एस सारखे उष्माघातावरील उपाय, पिण्याचं पाणी साठवण्याची पुरेशी व्यवस्था, आवश्यक फर्निचर, स्त्री आणि पुरुषांसाठी पुरेशी स्वतंत्र स्वच्छतागृहे, पुरेशा आकाराच्या छतासह सावलीची व्यवस्था आणि पुरेशा प्रमाणात वैद्यकीय सुविधा असल्याची खात्री करणं गरजेचं राहणार आहे.

**पियुष गोयल बिझनेस**

भारताच्या विकासात व्यापारी वर्गाचं फार मोलाचं योगदान आहे,असं मत केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी व्यक्त केलं. ते काल मुंबईमध्ये एका व्यापारी संमेलनात बोलत होते. गेल्या 10 वर्षात भारतानं जगात सर्वात सक्षम अर्थव्यवस्था असलेल्या पहिल्या 5 देशांमध्ये आपलं स्थान पक्कं केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वामुळं आज आपण सकारात्मक बदल आणि विकास पाहत आहोत असं ते यावेळी म्हणाले.

**<u>बांदीपोरा-लोकसभा</u>**

'मतदारांचं शिक्षण आणि निवडणूक सहभाग' या मोहिमे अंतर्गत, उत्तर काश्मीरमधील बांदीपोरा जिल्हा प्रशासनानं काल 'मिनी सचिवालय' बांदीपोरा इथून कबुतरं सोडण्याचा अनोखा उपक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाला बांदीपोरा जिल्हा निवडणूक अधिकारी शकील उल रहमान, यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते. आगामी लोकसभा निवडणुकीत प्रथमच मतदान करणारे; नव्यानं आणि पहिल्यांदाच नोंदणी केलेले मतदारही या कार्यक्रमात मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

**<u>मोदी</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम बंगालच्या बशीरहाटमधील भाजप उमेदवार आणि संदेशखली पीडितांपैकी एक असलेल्या महिलेशी दूरध्वनीवरून संवाद साधत त्यांना शक्ती स्वरूप अशी उपमा दिली. यावेळी मोदी यांनी लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या तयारीबद्दल विचारणा केली. संदेशखलीतील लोकांचं  जीवनमान सुधारण्यासाठी आपण कठोर परिश्रम करणार असल्याचं त्या म्हणाल्या.

**<u>हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण विविध भारतीच्या पुणे केंद्रावरुन ऐकत आहात...</u>**

**<u>सीयुईटी-युजी</u>**

सियुईटी -युजी-2024 परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख 31 मार्च केली गेली असल्याचं युजीसी अध्यक्ष एम.जगदेश कुमार यांनी सांगितलं. हा निर्णय उमेदवार आणि संबंधितांच्या विनंतीनंतर घेतला असल्याचं त्यांनी सांगितलं. ही परीक्षा 380 शहरांमध्ये घेतली जाणार असून यामध्ये भारताबाहेरील 26 शहरांचा समावेश आहे.

**जपान लढाऊ विमान निर्यात**

आपली लढाऊ विमानं ज्या देशांबरोबर सामंजस्य करार झालेला आहे आणि ज्या देशांमध्ये कोणताही संघर्ष सुरु नाही अशाच देशांना निर्यात करण्याचा निर्णय जपानच्या मंत्रिमंडळानं घेतला आहे. मंत्रिमंडळाचे मुख्य सचिव योशिमासा हयाशी यांनी चीन आणि उत्तर कोरिया मुळे उत्पन्न झालेल्या धोक्याचं उदाहरण समोर ठेऊन जपान च्या सुरक्षिततेचा विचार करून हा बदल आवश्यक असल्याचं म्हटलं आहे. ब्रिटन आणि इटलीच्या मदतीनं जपान नव्या विमानांची निर्मिती करत असून 2035 पर्यंत ही विमानं तयार होतील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

**सेनेगल**

सेनेगलमध्ये, विरोधी पक्षनेते बसिरो डिओमाये फेय यांना देशाचे आगामी अध्यक्ष म्हणून जाहीर करण्यात आलं आहे. त्यांची तुरुंगातून सुटका झाल्यानंतर दोन आठवड्यांच्या आतच ही घोषणा करण्यात आली आहे. रविवारच्या मतदानाचे अधिकृत निकाल अद्याप आलेले नसताना, विद्यमान अध्यक्ष मॅकी सॅल यांनी प्राथमिक निकालांच्या आधारे आपला पराभव मान्य केला. सॅल यांनी अभिनंदन करत 44 वर्षीय फेय यांना विजेते म्हणून घोषित केलं.

**अंतर संसदीय संघ जिनेव्हा**

राज्यसभेचे उपाध्यक्ष हरिवंश यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संसदीय प्रतिनिधी मंडळाचा एक संघ स्वित्झर्लंडमधे होत असलेल्या अंतर संसदीय संघ अर्थात आयपीयु च्या संम्मेलनामध्ये सहभागी झाला आहे. या प्रतिनिधी मंडळामध्ये एस.निरंजन रेड्डी, सुजित कुमार, अशोक मित्तल, प्रशांत नंदा आणि सुमित्रा यांचा समावेश आहे.

भारताच्या या शिष्टमंडळानं आर्मेनिया बरोबर द्विपक्षीय बैठकीमध्ये सहभाग घेतला. यामधे आपसातील हित आणि द्विपक्षीय संसदीय सहयोग वाढवण्याच्या दृष्टीनं प्रयत्न करण्याच्या मुद्द्यांवर चर्चा झाली.

**राजदूत**

ज्येष्ठ अधिकारी अभय ठाकूर म्यानमार मध्ये भारताचे नवे राजदूत म्हणून काम पाहणार आहेत. 1992 च्या तुकडीतील आयएफएस अधिकारी असलेले ठाकूर लवकरच आपला पदभार स्वीकारतील असं परराष्ट्र मंत्रालयानं प्रसारित केलेल्या पत्रकात म्हटलं आहे. सध्या ते परराष्ट्र मंत्रालयात विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

**बाल्टिमोर पूल दुर्घटना**

अमेरिकेच्या बाल्टिमोर मध्ये फ्रान्सिस स्कॉट हे मालवाहू जहाज पुलाला धडकल्यानं पुलाचा एक मोठा भाग तुटून वाहून गेला आहे. पुलाला धडकल्यानंतर जहाजाला आग लागून ते बुडालं. या दुर्घटनेमधून 2 जणांना वाचवण्यात यश आलं असून 6 जण बेपत्ता आहेत. ते सर्वजण पुलाच्या दुरुस्तीचं काम करत होते.

**टेनिस**

मियामी खुल्या टेनिस स्पर्धेमध्ये, रोहन बोपण्णा आणि मॅथ्यू एबडेन या जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या जोडीनं पुरुष दुहेरी गटाच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. त्यांनी उपांत्यपूर्व फेरीत नेदरलँडच्या सेम व्हर्बीक आणि ऑस्ट्रेलियाच्या जॉन-पॅट्रिक स्मिथचा 3-4, 7-5, 10-7 असा पराभव केला.

**हवामान**

येत्या 30 तारखेपर्यंत जम्मू, काश्मीर, लडाख, मुझफ्फराबाद, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये तुरळक ठिकाणी विजांसह पावसाचा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे. आगामी 5 दिवस पश्चिम हिमालयी प्रदेश आणि उत्तर-पश्चिम भारतालगतच्या मैदानी भागात गडगडाटी वादळासह पावसाचा अंदाज आहे. पुढील दोन दिवस या भागात गारपीट, विजा आणि ढगांच्या गडगडाटासह पावसाचा जोर वाढण्याची शक्यता असून याच काळात ईशान्य भारतात वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाचा अंदाज हवामान खात्यानं वर्तवला आहे.

---

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार**.